# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / प्रथम प्राधान्य / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/ ९४ दिनांक : 29 JAN 2019

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याबाबत...**

**संदर्भ :** **१. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०१/२०१९ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ७ मधील निर्देशानुसार सादर.**
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे पत्र क्र. संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/८३, दिनांक २३/०१/२०१९.
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/६८, दिनांक १८/०१/२०१९.
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/६१, दिनांक १६/०१/२०१९.
५. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे परिपत्रक क्र. संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/४८, दिनांक ११/०१/२०१९.

विषयांकित प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेकरिता प्राधिकरणाच्या www.safalta.org या संकेतस्थळावर "नोंदणी प्रक्रिया" सोबत जोडलेल्या "प्रपत्र - अ" प्रमाणे अद्यापही शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी पूर्ण केलेली नाही. तथापि महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन संबंधीत महाविद्यालयांना **शेवटची संधी म्हणुन दिनांक २९/०१/२०१९ (सायं. ०५:००) ते ३०/०१/२०१९ (सांय. ०५:००) पर्यंत मूदतवाढ** देण्याचे प्रवेश नियामक प्राधिकरणाने निश्चित केले आहे. सबब खाजगी व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) दंड भरण्याच्या अटींवर मूदतवाढ देण्याचे प्राधिकरणाने निश्चित केलेले आहे.

तसेच शासकीय/महानगरपालिका/अनुदानित या महाविद्यालये "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरल्याने, सदरील बेजबाबदार व कसूरदार महाविद्यालयातील दंडाची रक्कम कोणाकडून वसूल करावी या संदर्भात जबाबदारी (अधिकारी/कर्मचारी) निश्चित करण्याबाबत शासनास अवगत करण्यात येत आहे व तद्नुषंगाने शासनाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधीत महाविद्यालयांच्या दंडात्मक कार्यवाहीसंदर्भात प्राधिकरणाकडून स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. तथापि सद्यस्थितीमध्ये संबंधीत

शासकीय / महानगरपालिका / अनुदानित महाविद्यालयांना नोंदणी करताना 'दंड भरणे' अथवा 'दंड न भरणे' असे दोन्ही पर्याय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, याची कृपया नोंद घ्यावी. शासकीय/महानगरपालिका/अनुदानित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची संगणकीय तपासणी दिनांक ३१ जानेवारी २०१९ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य आहे, प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशात त्रुटी आढळल्यास संबंधीत महाविद्यालयाने त्यांच्या लॉग-ईन मध्ये त्रुटींची पूर्तता दिनांक ३१/०१/२०१९ पूर्वी पूर्ण करावी.

सदर प्रक्रियेसाठी जी शासकीय/महानगरपालिका/अनुदानित/खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये "नोंदणी प्रक्रिया" करण्यास असमर्थ ठरतील अशा महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांच्याबाबत शासनाला अवगत करण्यात येईल तसेच संबंधीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने उचित कारवाई करण्यात येईल.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळुन आलेल्या आहेत, अशा प्रवेशांसबंधी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्रुटींची पूर्तता करण्याकरिता संबंधीत कागदपत्रे पडताळणी केंद्रावर दिनांक ३०/०१/२०१९ व ३१/०१/२०१९ रोजी रात्री १२:०० वा. पर्यंत सादर करण्याबाबत संबंधीत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना अंतिम मूदतवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) पोट कलम (३) मधील तरतूदींच्या अनुषंगाने, उक्त नमूद विहित कालावधीमध्ये त्रुटींची पूर्तता करण्यास जे महाविद्यालय/संस्था असमर्थ ठरतील, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता होणार नाही व तद्नुषंगाने संबंधीत विद्यापीठास कळविण्यात येईल, या संदर्भात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास, त्यास सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय/संस्था जबाबदार राहील, याची सर्व संबंधीतांनी कृपया गंभीर दखल घ्यावी.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**आयुक्त व सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,-
१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

प्रत आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित,
मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि., पुणे.

प्रत,-
१. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक.
२. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

## ANNEXURE - A

| Sr. No | Directorate Name | Course Name | College Code | Name of College |
|---|---|---|---|---|
| 1 | DHE | BA/BSc – B.Ed. (Integrated) | '2692201' | DEPARTMENT OF EDUCATION & EXTENSION |
| 2 | DMER | B.D.S. | '02101' | GOVERNMENT DENTAL COLLEGE MUMBAI |
| 3 | DMER | B.D.S. | '02102' | NAIR HOSPITAL DENTAL COLLEGE MUMBAI |
| 4 | DMER | B.D.S. | '02207' | GOVT. DENTAL COLLEGE NAGPUR |
| 5 | DMER | B.P.Th. | '06102' | SETH G S MEDICAL COLLEGE, PAREL MUMBAI |
| 6 | DMER | B.P.Th. | '06208' | PHYSIOTHERAPY SCHOOL & CENTRE, GMC NAGPUR |
| 7 | DMER | B.Sc. Nursing | '09111' | COLLEGE OF NURSING, SIR J.J. GROUP OF HOSPITALS MUMBAI |
| 8 | DMER | B.Sc. Nursing | '09168' | SAMARTHA NURSING COLLEGE SAVARDA RATNAGIRI |
| 9 | DMER | B.Sc. Nursing | '09212' | COLLEGE OF NURSING GMC & HOSP NAGPUR NAGPUR |
| 10 | DMER | B.Sc. Nursing | '09361' | Shri Dhaneshwari Nursing College AURANGABAD |
| 11 | DMER | M.B.B.S. | '01109' | RAJEEV GANDHI MEDICAL COLLEGE THANE |
| 12 | DMER | M.B.B.S. | '01114' | DR. V.M. MEDICAL COLLEGE SOLAPUR |
| 13 | DMER | M.B.B.S. | '01221' | GOVT. MEDICAL COLLEGE NAGPUR |
| 14 | DMER | M.B.B.S. | '01226' | SHRI V.N. GOVT. MEDICAL COLLEGE YEOTMAL |
| 15 | DMER | M.B.B.S. | '01242' | GONDIA GOVT. MEDICAL COLLEGE GONDIA |
| 16 | DMER | PGD – Post Graduate Dental | '02101' | GOVERNMENT DENTAL COLLEGE MUMBAI |
| 17 | DMER | PGD – Post Graduate Dental | '02102' | NAIR HOSPITAL DENTAL COLLEGE MUMBAI |
| 18 | DMER | PGD – Post Graduate Dental | '02207' | GOVERNMENT DENTAL COLLEGE NAGPUR |
| 19 | DMER | PGD – Post Graduate Dental | '20' | ADITYA DENTAL COLLEGE BEED |
| 20 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01114' | DR. V.M. MEDICAL COLLEGE SOLAPUR |
| 21 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01136' | SMT.KASHIBAI NAVALE MEDICAL COLLEGE PUNE |
| 22 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01138' | ESIPGIMSR, ANDHERI ANDHERI MUMBAI |
| 23 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01221' | GOVT. MEDICAL COLLEGE NAGPUR |
| 24 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01223' | N.K.P. SALVE MEDICAL COLLEGE NAGPUR |
| 25 | DMER | PGM - Post Graduate Medical | '01226' | SHRI V.N. GOVT. MEDICAL COLLEGE YEOTMAL |
| 26 | DMER | PGP – Post Graduate | '06102' | G. S. COLLEGE OF PHYSIOTHERAPY, PAREL MUMBAI |
| 27 | DMER | PGP – Post Graduate | '06121' | COLLEGE OF PHYSIOTHERAPY, HAJI ALI MUMBAI |

| Sr. No | Directorate Name | Course Name | College Code | Name of College |
|---|---|---|---|---|
| 28 | DMER | PGP – Post Graduate | '06208' | GMC COLLEGE OF PHYSIOTHERAPY, NAGPUR NAGPUR |
| 29 | DOA | B.A.M.S. – Ayurved | '03232' | GOVT AYURVEDIC COLLEGE NAGPUR |
| 30 | DOA | PGA – Post Graduate Ayurved | '03107' | ASHTANG AYURVEDIC COLLEGE PUNE |
| 31 | DTE | DSE (Direct Second Year Degree | '2021' | University Department of Chemical Technology, Aurangabad |
| 32 | DTE | DSE (Direct Second Year Degree | '3012' | Veermata Jijabai Technological Institute(VJTI), Matunga, Mumbai |
| 33 | DTE | DSE (Direct Second Year Degree | '3191' | Mandar Education Society's Rajaram Shinde College of Engineering, Pedhambe |
| 34 | DTE | DSP (Direct Second Year Degree | '2150' | Bhagwan College of Pharmacy, Aurangabad |
| 35 | DTE | DSP (Direct Second Year Degree | '2560' | Anand Charitable Sanstha's College of Pharmaceutical Science & Research, A/P Gangai Nagar, Mursadpur, Ashti, Tal.Ashti Dist Beed |
| 36 | DTE | DSP (Direct Second Year Degree | '2561' | Rajesh Bhaiyya Tope College of B Pharmacy, Nipani, Aurangbad - At Nipani - Bhalagaon, Beed-Highway Aurangabad. |
| 37 | DTE | DSP (Direct Second Year Degree | '2574' | Durgamata Institute of Pharmacy, Dharmapuri, Taluka & District Parbhani |
| 38 | DTE | M. Engineering/M.Tec | '2030' | Department of Computer Science and IT, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad |
| 39 | DTE | M. Engineering/M.Tec | '6881' | Army Institute of Technology, Pune |
| 40 | DTE | MBA/MMS | '3001' | Jamnalal Bajaj Institute of Management Studies, Mumbai |